**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

**भाग १२ ड**

## 'एक महान, ज्ञानी माणूस निराश झाला'

मग भगवानांनी एक छोटीशी गोष्ट सांगायला सुरूवात केली. ती गोष्ट काय होती? एक ज्ञानी माणूस, कल्पना करता येणार नाही इतका गरीब होता. त्याला रोजची एक चतकोर भाकरीही मिळत नव्हती. तो त्याच्या कुटुंबाचे पोषणही करू शकत नव्हता. असे असह्य जीवन कंठत असताना दररोज तो मंदिरात भगवत्‌गीतेवर प्रवचन करीत असे.

एक दिवस तो आपल्या अशा या जगण्यावर खूप चिडला. कधी कधी आपणदेखील नैराश्यात जातो, निराश होतो, कारण आपणही माणूसच आहोत. आपण कधी उदास होतो, कधी कधी आयुष्य अगदी विफल वाटतं. आपण आता प्रशांती-निलयममध्ये असल्याने त्यातून लवकर सावरतो. जर आपण आपल्या जन्मगावी असतो तर आपल्याला मानसोपचारतज्ज्ञाची आवश्यकता वाटली असती.

तर काय, तो ज्ञानी माणूस गरीब होता, खूप निराश आणि विश्वास गमावलेला असा होता. भगवत्‌गीतेत एक श्लोक आहे, तो असा-

अनन्याश्चिन्तयतो मां<br>
ये जनाः पर्युपासते।<br>
तेषां नित्याभियुक्तानां<br>
योगक्षेम वहाम्यहम्।।

या श्लोकाचा अर्थ असा आहे, जो जो माझी अनन्यसाधारण भक्ती करतो, माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवतो, तो विजयी होतो. तुमच्या कल्याणाची काळजी घेणं हे माझं कर्तव्यच आहे.

''मी सदैव तुझाच विचार करतो, तुझ्याविषयीच बोलतो. तू मात्र माझी काळजी घेण्याचं वचन दिलं होतंस, तू माझी काळजी घेतली नाहीस, असं तो गरीब ज्ञानी म्हणाला.''

त्याने तो श्लोक काढून, फाडून टाकला आणि त्याचे तुकडे तुकडे केले. एवढंच नाही तर त्याने कात्री घेऊन, बदला घेण्याच्या भावनेने लहान लहान तुकडे केले. ती दुपारची वेळ असल्याने तो वामकुक्षीसाठी अंथरुणावर पडला.

## 'त्यानी आपल्या पाठीवर घाव घातले.'

त्यावेळेस दोन मुलं तिथे आली. त्यातील एक खूप गोरा आणि दुसरा निमगोरा होता.

त्या ज्ञानी माणसाच्या पत्नीने मुलांचे स्वागत केले आणि म्हणाली, ''मुलांनो, तुम्हाला काय पाहिजे आहे?''

मुलं म्हणाली, ''अम्मा, आम्ही ही दोन तांदुळाची पोती इथे ठेवण्यासाठी आलो आहोत. तांदुळाची ही पोती इथे ठेवण्याची आम्हाला आज्ञा आहे. आम्ही ती इथे रिकामी करतो.''

त्यांनी ती तांदुळाची दोन्ही पोती रिकामी केली आणि त्या ज्ञानी माणसाच्याबद्दल त्याच्या बायकोकडे

तक्रार केली. ‘‘हे पहा माई, तुझा नवरा चांगला माणूस नाही.’’ ‘‘काय!’’

‘‘त्याने धारदार पात्यांनी आमच्या पाठींवर वार केले आहेत. पाहा. त्यातून रक्त वाहत आहे. पाहा!’’

ती बाई म्हणाली, ‘‘नाही, नाही. माझा नवरा या वृत्तीचा नाही. तो प्रवचनकार आहे. तो गीतेवर भाष्य करतो. तो हिंसा करणारा नाही. तो कुणावरही पात्यानी घाव करणारा नाही. तो असं करणं शक्यच नाही.’’

‘‘नाही, माई! हे तुझ्या नवऱ्यानेच केले आहे’’ असं म्हणून ती दोन्ही मुलं निघून गेली. तो ज्ञानी माणूस आपल्या गाढ झोपेतून जागा झाला, तेव्हा त्याला दोन पोती तांदूळ दिसले. त्याने आपल्या पत्नीला हाक मारली. त्याची पत्नी म्हणाली, ‘‘त्या दोन मुलांना तांदुळाची दोन पोती इथे ठेवण्याची आज्ञा होती असं दिसतंय. त्यांनी ती इथे रिकामी केली.’’

‘‘ओह, ओह! छान! ती दोन मुलं कोण होती?’’

पत्नी म्हणाली, ‘‘हा प्रश्न तुम्ही का विचारता? ती मुलं म्हणजे ज्याच्या पाठीवर तुम्ही वार केलेत, तीच ती दोन मुलं होती.’’

‘‘मी? आणि त्यांच्या पाठीवर कापलं? मी कधीच असं केलेलं नाही. मी असं करणारच नाही.’’

मग त्या ज्ञानी माणसाने विचारलं, ‘‘ती मुलं कशी दिसत होती? ती काय वयाची होती?’’

पत्नी म्हणाली, ‘‘दोन तरुण मुलं– एक गोरा आणि दुसरा सावळा होता.’’

तेव्हा त्या ज्ञानी माणसाच्या लक्षात आले. सावळा तो कृष्ण आणि गोरा – त्याचा भाऊ बलराम होता. ते कृष्ण आणि बलरामच होते!’’

त्याने ताबडतोब आपल्या पत्नीचे पाय धरले आणि म्हणाला, ‘‘तू किती भाग्यवान आहेस! तू कृष्ण–बलरामांना स्वत: पाहिलंस. मी इतकी वर्षं गीतेवर प्रवचने देत असूनही त्यांना पाहू शकलो नाही. तू खरोखरच भाग्यवान आहेस!’’

भगवानांनी आम्हाला ही गोष्ट सांगितली, ‘‘जो परमेश्वराला शरण जातो, त्याला या जगात कधीही, काहीही कमी पडत नाही. ते कधीही गरीब राहणार नाहीत कारण ते त्याला पूर्णपणे शरण गेलेले असल्याने तो परमेश्वर त्यांची पूर्ण काळजी घेतो.’’

## ‘बिभीषण हा भीष्मांपेक्षा महान/श्रेष्ठ होता.’

मग भगवानांनी दोन व्यक्तींचा उल्लेख केला. एक म्हणजे महाभारतातील भीष्म आणि दुसरा रामायणातील बिभीषण.

स्वामी म्हणाले, ‘‘रामायणातील बिभीषण हा महाभारतातील भीष्माचार्यांहून श्रेष्ठ होता. भारतातील माणसांना ते माहीत नाही आणि हिंदू ते मान्य करणार नाहीत. बिभीषण हा धनुर्विद्येमध्ये किंवा तपश्चर्येमध्ये किंवा विद्वत्तेमध्ये मोठा नव्हता. तो फक्त रावणाचा भाऊ होता. लंकेचा सामान्य नागरिक होता. पण भीष्माचार्य हे महान् व्यक्ती आहेत.

बाबा म्हणतात, ‘‘बिभीषण हा भीष्माचार्यांपेक्षा श्रेष्ठ आहे. पण ते कोण मान्य करेल?’’

स्वामी दुसरे एक परिमाण देतात– भीष्माचार्य जरी मोठे, महान होते, ज्ञानी होते, धनुर्विद्येत पारंगत होते, ते महान तपस्वी होते. तरी ते साध्या, सर्वसामान्य बिभीषणापेक्षा कमीच होते – का? कारण बिभीषणाच्या लक्षात आलं की, त्याचा भाऊ रावण हा चूक करत आहे, अपराधी आहे, तेव्हा त्याने लगेचच भावाला थांबवले व म्हणाला, ‘‘तू हे करायला नको होते. बंधू! तू दुसऱ्याची पत्नी पळवून आणायला नको होतीस, हा अपराध आहे. जर एखाद्याने तुझ्याबाबतीत असं केलं असतं, तर तुला दु:ख झालं नसतं का?’’

बिभीषणाने रावणाला विरोध केला. त्याला रावणाला धडा शिकवायचा होता. पण थोरल्या भावाने, रावणाने, ते ऐकण्यास नकार दिला. म्हणून बिभीषण रावणापासून दूर गेला व रामाला शरण गेला. पण महाभारतातील भीष्म, जो सर्व दृष्टींनी महान होता, तो अविचारी अशा कौरवांबरोबरच राहिला. ते क्रूर होते. भीष्मांनी त्याची साथ कधीच सोडली नाही. म्हणूनच तुम्ही कितीही हुशार असाल, ज्येष्ठ असाल, तुम्ही ज्ञानी असाल, पारंगत असाल, पण तुम्ही जर दुष्टांनाच मदत कराल, त्यांच्याशीच जुळवून घ्याल तर सर्वार्थाने अनर्थच होईल. तुम्ही साधे-सरळ असाल, नम्र असाल, अगदी सामान्य असाल आणि तुमच्या अगदी जवळच्या नातेवाईकांच्या, जर ते वाईट असतील, त्यांच्यापासून तुम्ही दूर राहाल आणि परमेश्वराला शरण जाल, तर जगातल्या सर्वात महान शक्तींपेक्षाही मोठे व्हाल. भगवान असं म्हणाले.

त्यांनी दुसरे एक उदाहरण- प्रल्हादाचे दिले. महाभारतातील प्रल्हाद आपल्या वडिलांपेक्षा, त्याच्या विचारांपेक्षा वेगळा होता. त्याच्या वडिलांनी-हिरण्यकश्यपूने- प्रल्हादाला विष देऊन त्याची परीक्षा घेतली, त्याला हत्तीच्या पायांखाली तुडवले, त्याला अग्नीमध्ये ठेवले- पण प्रल्हादाला काहीही झालं नाही. तो सर्व परीक्षांमधून सुखरूप पार पडला. हेसुद्धा भगवानांनी सांगितले.

'किंगकाँगला त्याची चूक समजली'

स्वामींनी दुसरे उदाहरण दिले. तुम्ही हे काळजीपूर्वक ऐकावं असं मला वाटतं, कारण तुम्ही त्यातून काहीतरी धडा शिकावा. तुम्ही किंगकाँगबद्दल ऐकलंच असेल. (हशा) हो, किंगकाँग हा चांगले शरीर कमावलेला, कुस्तीगीर होता. आह! त्याचे नाव ऐकताक्षणीच तुम्ही त्याच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना करू शकता. किंगकाँगचे शरीर चांगलं कमावलेलं होतं. एखाद्या स्नायूंच्या प्रचंड पर्वतासारखं होतं. आपलं शरीर कमावण्यासाठी तो रोज सकाळी व्यायाम करीत असे. (हशा.)

एक दिवस सकाळी तो जेव्हा व्यायाम करीत होता, तेव्हा रस्त्यावरून एक मुलगी चालली होती, तिनं त्या सर्वांगावर स्नायूंचा डोंगरच असलेल्या गंमतीदार प्राण्याकडे पाहिले. किंगकाँगने त्या वेळेस तोकडे कपडे घातले असल्याने तिला हसू आले. (हशा.)

ती मुलगी हसली म्हणून किंगकाँग खूपच रागावला आणि म्हणाला, ''तू माझ्याकडे पाहून हसते आहेस?''

तो तिला दोन ठोसे देण्याच्या बेतात होता (हशा.) मुलगी जास्तच हसू लागली. तेव्हा किंगकाँग म्हणाला, ''तू मला का हसते आहेस?''

मुलीनं उत्तर दिलं, ''सर, तुमच्याकडे खूप ताकद आहे. पण तुम्ही तुमच्या स्वत:च्या भावनांवर ताबा ठेवू शकत नाही. तुम्ही का ताबा ठेवू शकत नाही? तुम्ही तुमच्या रागावर नियंत्रण ठेवू शकत नाही, त्यामुळे तुमची शारीरिक ताकद निरूपयोगी आहे. जेव्हा एखादी लहानशी मुलगी तुमच्याकडे पाहून हसते, तेव्हा तुमचं काय नुकसान होतं? तुम्ही तुमच्याकडील दोन पौंड मास काही गमावत नाही, मग तुम्ही रागावता कशाला?'' तेव्हा किंगकाँगला त्याची चूक लक्षात आली.

हे उदाहरण देऊन बाबा सांगतात, ''मुलांनो, तुम्ही शारीरिक दृष्टीने कणखर, बळकट असणं हे पुरेसं नाही, मनाने नेहमी जागरूक असणं हेही पुरेसं नाही. तुम्ही स्वत:वर ताबा ठेवणं हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्ही तुमच्या मनाचा समतोल ठेवणं हे जास्त महत्त्वाचं आहे.''

मुलांची देखभाल करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे वळून त्यांनी सांगितलं, ''आपल्या मुलांची काळजी घ्या, ते व्यवस्थित अभ्यास करताना, हे पाहा, ती मुले निरोगी आणि सशक्त असावीत ह्याकडे लक्ष द्या. माझी मुलं जर आनंदी असतील, तर मी आनंदी असेन.''

पुढे त्यांनी त्या अधिकाऱ्यांना सांगितलं, ''आपल्या संस्था व्यापार-व्यवसाय करणाऱ्या नाहीत, किंवा फायदा मिळविण्यासाठीही नाहीत. नाही, नाही, नाहीत! दुसऱ्या संस्थांशी आपल्या संस्थांची तुलना करू नका.

नकोच! आपण अगदी निराळे आहोत. मला कसलाही फायदा मिळवायचा नाही. मला कसलाही व्यापार करायचा नाही. तुम्ही आपली मुलं सुदृढ असण्याकडे लक्ष देत आहात, हेच मला पाहिजे आहे. ते फार महत्त्वाचं आहे. आपल्या मुलांनी फक्त पुस्तकी शिक्षणापेक्षा मौलिक गुणविशेष शिकून घेतले पाहिजे. ह्या संस्था सुरू करण्यामागे हेच कारण आहे.''

### ''मला सर्व काही माहीत आहे.''

अचानक एक सभ्य गृहस्थ, प्रोफेसर उभे राहिले आणि स्वामींना काहीतरी म्हणाले, ''स्वामी, हे घडलंय, स्वामी हे असंच घडलं आहे.'' तो स्वामींना काहीतरी घडल्याबद्दल सांगत होता.

स्वामी ताबडतोब त्याच्याकडे वळले आणि म्हणाले, ''मला माहीत आहे. तू हे मला का सांगत आहेस? मी कुठे आहे? कसा आहे? मला प्रत्येक गोष्ट माहीत आहे.''

नंतर मी स्वत:शी विचार केला, ''तुला कसं माहीत आहे?'' (हशा.) मी तोंड उघडलं नाही कारण मला माहीत होतं की ते धोक्याचं होईल.

मग, कुठलाही प्रश्न विचारला गेल्याशिवाय बाबा म्हणाले, ''पाण्यात पोहावं कसं हे माशाला कुणी शिकवलं का? ते मला सांगायची किंवा शिकवण्याची गरज नाही. मला सर्व माहीत आहे.'' ते म्हणाले, ''मला सर्व काही ठाऊक आहे.''

न विचारताच माझ्या मनातल्या शंकांचं व्यवस्थित उत्तर मिळालं.

आणि आता एवढंच पुरे– मला वाटतं मी सर्व काही सांगितलं आहे.

***